# प्रकरण तिसरे

# परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी

**३.१ प्रस्तावना :**

'दक्षिण गंगा' या नावाने ओळखत आलेल्या गोदावरी नदीच्या खोऱ्यात वसलेला परभणी हे एक मराठवाड्यातील जिल्हा आहे. प्राचीन काळामध्ये परभणी गावाला 'प्रभावती' या नावाने ओळखत असे. परभणीमध्ये 'प्रभावती' या देवींचे सुंदर भव्य स्वरूपाचे मंदिर होते. या देवीच्या नावावरून या शहरांना 'प्रभावती' नाव देण्यात आले. खिलजी साम्राज्याच्या काळामध्ये येथील मंदिराचे मशीदीमध्ये रूपांतर करण्यात आले. आजच्या काळात सध्या ही मशीद 'रोशनखन गल्ली मशीद' म्हणून प्रसिद्ध आहे. परभणी ग्रामनामाच्या व्युत्पतीबद्दल सबळ पुरावे उपलब्ध नाही. तरीही बहुतांश प्रभावतीचा अभ्रश घेऊन परभणी हे नाव पडले असावे असे समजतात.[१]

महाराष्ट्र राज्यातील दख्खन पठारावर असलेल्या मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यापैकी परभणी हा एक जिल्हा आहे. मोगलांच्या काळामध्ये परभणी जिल्ह्याचा समावेश प्रामुख्याने वऱ्हाडातील पाथरी आणि वाशिम सरकारामध्ये समावेश होता. निजाम आणि इंग्रज सरकार या दोघांमध्ये १८५३ साली झालेल्या ऐतिहासिक तहानुसार एकूण ५० लाख रूपये महसूली उत्पन्नाचे जिल्हे इंग्रजांनी निजामाकडून घेतले. या अभ्यर्पित जिल्ह्यात पुढील जिल्ह्याचा समावेश होतो. पुढे निजामाकडील वऱ्हाडचा अल्पसा उर्वरित प्रदेश आणि गोदावरीच्या दक्षिणेकडील काही तालुके तसेच परतूर तालुका एकत्र करून सालारजंगने स्वतंत्र्य परभणी जिल्हा निर्माण केला. त्या अगोदर परभणी जिल्हा बुलढाणा, अकोला, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यासह विदर्भात समाविष्ठ होता.[२]

परभणी जिल्ह्यातून १ मे १९८१ साली जालना या नवीन जिल्ह्याची निर्माती करण्यात आली. त्यानंतर परभणी जिल्ह्यातील परतूर तालुका नवीन जालना

जिल्ह्यात समावेश केला आहे. त्यानंतर जिंतूर कळमनुरी, हिंगोली, परभणी, पाथरी, गंगाखेड, वसमत या सात तालुक्याचा मिळून परभणी जिल्ह्याची निर्माती झाली. १३ ऑगस्ट १९९२ या दिवशी पुन्हा महाराष्ट्र सरकारने परभणी जिल्ह्यातील काही तालुक्याचे विभाजन करून पाच तालुके नव्याने निर्माण केले. त्यात पालम, पूर्णा, सेनगाव, औंढा नागनाथ, आणि सेलू तालुक्याचा समावेश होते. १ मे १९९९ या रोजी परभणी जिल्ह्याचे विभागणी करून हिंगोली या जिल्ह्याची निर्माती केली आहे. आजच्या परभणी जिल्ह्यामध्ये पूर्णा, जिंतूर, सेलू, मानवत, पालम, सोनपेठ, गंगाखेड, आणि परभणी या नऊ तालुक्यांचा समावेश होतो.

परभणी जिल्हा हा महाराष्ट्राच्या पूर्व दिशेला आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६५११ चौ.मी. आहे. परभणी जिल्ह्याची समुद्र सपाटीपासून सर्वसाधारणपणे उंची ४५७ मीटर असून जिल्ह्यात सर्वात उंच भाग जिल्ह्याच्या पश्चिम दिशेला असलेल्या अंजिठा पर्वत आहे. या पर्वताची उंची ही ५७९ मीटर असून जिल्ह्यातील सर्वात कमी उंची जिल्ह्याच्या पूर्वेस जेथे गोदावरी नदी जिल्ह्याच्या सीमा पार करते. तिथे ३६० मीटर आहे. यावरून असे स्पष्ट होते की, पश्चिमेकडून पूर्वीकडे सर्वसाधारणपणे उतार आहे. गोदावरी ही जिल्ह्यातील मुख्य नदी आहे. गोदावरी काठावरील भाग सुपीक आहे. महाराष्ट्रातील शेती ही नैसर्गिक पावसावर अवलंबून आहे. परभणी जिल्हा हा हमखास पाऊस पडणारा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील लोक प्रामुख्याने शेती करतात. जिल्ह्यात रब्बी व खरीब पिके घेतली जातात.

### ३.२ स्थान व भौगोलिक वैशिष्ट्ये :

परभणी जिल्हा १८.४५ ते २०.०१ या उत्तर अंक्षाशावर ७६.१३ ने ७७.२६ पूर्व रेखांशाावर या भौगोलिक पट्यामध्ये वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा व हिंगोली, पश्चिमेस जालना, दक्षिणेस बीड आणि लातूर व पूर्वस नांदेड हे जिल्हे आहेत.

परभणी या जिल्ह्यात अजिंठा पर्वतांची एक रांग जिंतूर तालुक्यातून जाते. या रांगेमुळे जिल्ह्याच्या उत्तरेकडे पठार तयार झाले असून त्या पठारांची समुद्रसपाटीपासूनची ऊंची १५०० ते १६०० फूट आहे. या पठाराचा दक्षिणेकडे उत्तार असून तो दुधना नदीच्या खोऱ्यात समाविष्ट होतो. या शिवाय जिल्ह्याच्या दक्षिणेकडे गंगाखेड तहसिलमध्ये बालाघाट पर्वतांच्या कमी उंचीच्या रांगा पसरलेल्या आहेत. जिल्ह्यातील पाथरी, गंगाखेड, पालम, परभणी, व पूर्णा तहसिलच्या काही भागाचा समावेश गोदावरीच्या सुपीक खोऱ्यात होतो. तर सेलू, जिंतूर तहसिलच्या काही भागाचा समावेश दुधना नदीच्या खोऱ्यात होतो.

**३.३ क्षेत्र व व्यवस्थापकीय विभाग :**

परभणी जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ६५११ चौ.कि.मी. आहे. या जिल्ह्यात परभणी, जिंतूर, गंगाखेड, पाथरी, पूर्णा, पालम, सेलू, सोनपेठ व मानवत या नऊ तालुक्यांचा समावेश होतो. जिल्ह्यात दोन महसूल उपविभागापैकी सेलू या उपविभागात सेलू, जिंतूर, पाथरी व मानवत या तर परभणी या उपविभागात परभणी, पूर्णा, सोनपेठ, गंगाखेड व पालम या पाच तालुक्यांचा समावेश होतो.

२००१ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यात एकूण ८४१ खेडी असून त्यापैकी ८२८ वस्ती असलेली व १३ ओसाड आहेत. तहसिलनिहाय एकूण खेड्यांची संख्या परभणी १२८,जिंतूर १६४,सेलू ९३, गंगाखेड १०५, सोनपेठ ५७, मानवत ५४, पूर्णा ९०, पालम ८१, व पाथरी ५६ आहे. जिल्ह्यात एकूण आठ नगर परिषदापैकी परभणी शहर महानगर पालिका वर्गीय, गंगाखेड 'ब' वर्गीय तर बाकीच्या ६ 'क' वर्गीय आहेत. जिल्ह्यात नऊ तहसिल मुख्यालयापैकी पालम या ठिकाणी नगर परिषद नाही. जिल्ह्यात २०१२ अखेर ४०७ ग्रामपंचायती होत्या. ज्यांची सभासद संख्या ३०४२ आहे. जिल्ह्यात एकूण ९ ठिकाणी कृषि उत्पन्न बाजार समिती आहे.

**३.४ नद्या :**

गोदावरी ही  परभणी जिल्ह्यातील प्रमुख नदी असून भौगोलिकदृष्ट्या तिचे अनन्यसाधारण महत्व आहे. दुधना व पूर्णा या गोदावरीच्या प्रमुख दोन उपनद्या आहेत. गोदावरी नदी पाथरी, गंगाखेड व पालम या तालुक्यातून पश्चिमेकडून पूर्वेकडे ७९ कि.मी.वाहत जाऊन ती नांदेड जिल्ह्यात प्रवेश करते. दुधना नदी सेलू, जिंतूर, परभणी व पूर्णा या तालुक्यातून वाहत जावून ती हिंगोली जिल्ह्यात प्रवेश करते. औरंगाबाद जिल्ह्यात उगम पावलेल्या पूर्णा नदीवर जिंतूर तालुक्यातील येलदरी येथे धरण बांधलेले आहे.

**३.५ हवामान :**

परभणी जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या पावसाळी हवामाना व्यतिरिक्त इतर काळात मुख्यत्वेकरुन कोरडे असते. आक्टोंबर ते नोव्हेंबर मध्ये जिल्ह्यात मौसमेत्तर पाऊस पडतो. डिसेंबर ते फेब्रुवारी हिवाळा तर मार्च ते मे उन्हाळा असतो.

**३.६ पाऊस :**

परभणी जिल्हा हा खात्रीचा पाऊस पडणाऱ्या  प्रदेशात समाविष्ठ आहे. अलीकडील काळात जून ते डिसेंबर या कालावधीत नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून सरासरी ८०४.४ मी.मी. पाऊस पडतो. या शिवाय आक्टोंबर व नोव्हेंबर अखेर पर्यंत ईशान्य मान्सून वाऱ्यापासून सर्वसाधारणपणे १०२ मी.मी. पाऊस पडतो. जिल्ह्याच्या सर्व भागात सारखाच पाऊस पडत नाही. पश्चिमेकडून पूर्वेकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते. वर्षे २०११ यावर्षात परभणी जिल्ह्यात सरासरी ७५८.५० मी.मी. पाऊस पडला.

**३.७ मातीचा प्रकार :**

परभणी जिल्ह्यात सर्वसाधारणपणे पीकांना पोषक असलेल्या द्रव्यांची संपन्न अशी काळी जमीन आहे. जिल्ह्यात जमीनीची सुपीकता आणि खोली निरनिराळी आहे. जमीनीची सुपीकता लक्षात घेता जिल्ह्याच्या भूभागाचे प्रामुख्याने तीन विभाग

पडतात. गोदावरी नदीच्या खोऱ्यात खोल कसदार आणि सुपीक जमीन आहे. जिल्ह्यातील मध्य भागातील सेलू, पाथरी,परभणी व पूर्णा या तालुक्यातील संपूर्ण जमीन व जिंतूर तालुक्यातील काही भागातील जमीन ही मध्यम काळीभोर आहे. उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशातील व दक्षिणेकडील गंगाखेड व पालम तालुक्यातील काही भागातील जमीन हलकी आणि मध्यम प्रतीची आहे.

**३.८ लोकसंख्या :**

२०११ च्या जनगणेनुसार परभणी जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १८ लाख ३५ हजार ९८२ असून त्यापैकी ९ लाख ४६ हजार १८५ पुरुष तर ८ लाख ८९ हजार ७९७ स्त्रियां आहेत. त्याची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी अनुक्रमे ५१.५३ व ४८.४७ टक्के एवढी आहे. सन २०११ च्या जनगणेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी परभणी तालुक्यात २९.२९ टक्के, जिंतूर तालुक्यात १५.३६ टक्के, गंगाखेड तालुक्यात ११.०३ टक्के, पाथरी तालुक्यात ७.५६ टक्के, मानवत तालुक्यात ६.३६ टक्के, सोनपेठ तालुक्यात ४.८८ टक्के, पालम तालुक्यात ६.२८ टक्के, पूर्णा तालुक्यात ९.५५ टक्के, तर सेलू तालुक्यात ९.२४ टक्के लोक राहतात.

**३.८.१ लोकसंख्येची ग्रामीण आणि नागरी लोकसंख्येचे प्रमाण :**

२०११ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ६८.२४ टक्के लोक खेड्यात राहतात. एकूण ४.८५ लक्ष नागरी लोकसंख्येपैकी ५३.४५ टक्के लोक परभणी शहरात तर ८.३३ टक्के लोक गंगाखेड या दुसऱ्या क्रमांकाच्या शहरात राहतात. जिल्ह्यातील सोनपेठ हे शहर सर्वात लहान असून, त्यात जिल्ह्यातील २.६८ टक्के लोक राहतात.

**३.८.२ स्त्री-पुरुष यांचे प्रमाण :**

परभणी जिल्ह्यात २०११ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषामागे ९४६ स्त्रियां आहेत. जिल्ह्याचे ग्रामीण व नागरी भागाकरिता हेच प्रमाण अनुक्रमे ९३८ व

९४६ असे आहे. हे प्रमाण २००१ च्या जनगणनेपेक्षा ग्रामीण भागात १३ तर नागरी भागात २३ स्त्रियांनी कमी आहे.

**३.८.३ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती :**

परभणी जिल्ह्यात २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी जिल्ह्यात १,५२,४६३ (१०.००टक्के) अनुसूचित जातीचे तर ३५,२१० (२.३०टक्के) अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.

**कामगार :**

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण मुख्यतः काम करणाऱ्या व्यक्तिची संख्या ५.६० लक्ष असून ती एकूण लोकसंख्येच्या ३६.६५ टक्के आहे. २००१ च्या जनगणनेनुसार मुख्यतः काम कारणाऱ्यापैकी २४,२४७ लोक शेतकरी, ४६,३६२ शेतमजूर, ७,०२३ लोक व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात काम करणारे आहेत.

**३.८.४ धर्मानुसार लोकसंख्येचे वर्गीकरण :**

२००१ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक ७३.३९ टक्के लोक हिंदू धर्माचे तर सर्वात कमी लोक ०.०५ टक्के शिख धर्माचे आहे. बौध्द १०.३ टक्के, ख्रिश्चन ०.०९ टक्के, जैन .३७ टक्के, मुस्लीम १५.९६ टक्के आणि इतर धर्म व अनिर्देशित धर्म०.०९ टक्के आहे.

**३.८.५ साक्षरता :**

२००१ च्या जनगणनेनुसार परभणी जिल्ह्यातील सात वर्ष व त्यावरील वयोगटातील एकूण १२.५२ लक्ष लोकसंख्येच्या ८.३९ लक्ष (६७.०४टक्के) लोक साक्षर आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ५.२३ (६२.२६टक्के) तर नागरी भागात ३.१६ (७६.७९टक्के) लोक साक्षर आहेत. जिल्ह्यातील पुरुष व स्त्रियां यांची साक्षरता अनुक्रमे ८०.५८ टक्के व ५२.९८ टक्के आहे. तालुकानिहाय साक्षरतेची टक्केवारी याप्रमाणे आहे. परभणी ७१.६५, जिंतूर ६४.४८, गंगाखेड ६५.२१,

पाथरी ६२.०५, पूर्णा ६६.६३,पालम ६३.०७, सोनपेठ ६४.३६, मानवत ६४.२७ व सेलू ६३.५३ टक्के एवढी आहे.

**३.९ वापरातील निवासी घर व कुटुंब :**

जिल्ह्यात वापरातील निवासी घरांची एकूण संख्या ३.७६ लक्ष आहे. त्यापैकी २.९५ लक्ष (७९.००टक्के) ग्रामीण तर ०.८१ लक्ष (२१.००टक्के) नागरी भागात आहेत. जिल्ह्यात एकूण २.७८लक्ष कुटुंबे असून त्यापैकी १.९६ लक्ष ग्रामीण तर ०.८२ लक्ष कुटूंबे नागरी भागात असल्याचे आढळून येते.

**३.१० क्षेत्रावर जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न :**

परभणी जिल्ह्यासाठी क्षेत्रावर जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न अंदाज अंतर्गत एकूण प्राथमिक क्षेत्र अ, द्वितीय क्षेत्र ब, व एकूण तृतीय क्षेत्र क असे तीन विभागात असून, त्याचे सन २००८-२००९ साठीचे एकूण स्थुल जिल्हा चालू किंमतीनुसार ६१५१ कोटी रु. एवढे असून एकूण निव्वळ जिल्हा उत्पन्न ५५१९ कोटी रुपये एवढे आहे. तसेच स्थिर किमतीनुसार ३९०१ कोटी रु. एवढे असून एकूण निव्वळ जिल्हा उत्पन्न ३४९५ कोटी रुपये एवढे आहे.

**३.११ वने :**

अंतिम अंदाजानुसार सन २०११-२०१२ मध्ये जिल्ह्यात जंगल व्याप्त क्षेत्र १०२ चौ. कि.मी. असून ते जिल्ह्याच्या एकूण क्षेत्राच्या १.६० टक्के आहे.

**वन उत्पादन :**

परभणी जिल्ह्यात २०१०-२०११ या वर्षात गौणवन उत्पादन यांच्या विक्रीपासून ३२४०.१४ हजार रुपये उत्पन्न शासनास मिळाले.

**३.१२ कृषि :**

२०००-२००१ या वर्षाच्या स्थाई स्वरुपाच्या जमीन वापराच्या माहितीनुसार जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र ६,३१,०६२ हेक्टर आहे. त्यापैकी जंगल व्याप्त क्षेत्र २७,८०८ हेक्टर आहे. भौगोलिक क्षेत्रापैकी ४१,६३४ हेक्टर क्षेत्र लागवडीलायक

नाही. या व्यतिरिक्त लागवड करण्यायोग्य असूनही जे लागवडीखाली आणल्या गेले नाही असे २४,५०७ हेक्टर क्षेत्र आहे. एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी १९९९-२००० यावर्षात २,५९,६५६ हेक्टर क्षेत्र एकापेक्षा आधिक वर्षापासून पडीत आहे. जिल्ह्यात ३,६१,०६२ हेक्टर क्षेत्र लागवडीलायक आहे.त्यापैकी ६,४८,०४५ हेक्टर क्षेत्र प्रत्यक्ष लागवडीखाली आणल्या गेले असून या वर्षात २,४९,०५१ हेक्टर क्षेत्रात एकापेक्षा अधिकवेळा पीक घेण्यात आले आहे.

२०००-२००१ यावर्षात हे क्षेत्र (निव्वळ क्षेत्र) सर्वात जास्त परभणी तालुक्यात १,०७,४८२ हेक्टर तर सर्वात कमी सोनपेठ तालुक्यात १६,११० हेक्टर एवढे आहे. १९९९-२००० वर्षात हे क्षेत्र (लागवडीलायक क्षेत्र) सर्वात जास्त परभणी तालुक्यात १,१७,२८९ हेक्टर तर सर्वात कमी सोनपेठ तालुक्यात ३८,५०३ हेक्टर एवढे आहे.

जिल्ह्यातील तालुकावर लागवडीलायक क्षेत्राची त्याच तालुक्यातील निव्वळ कसलेल्या क्षेत्राची टक्केवारी १९९९-२००० वर्षात अशी होती. परभणी १,२५,०८६ हेक्टर, जिंतूर १,२५,७२२ हेक्टर, गंगाखेड ६६,०१३ हेक्टर, पाथरी ५५,३०१ हेक्टर, पूर्णा ६३,१७३ हेक्टर, तर सेलू ८१,४५५ हेक्टर आहे. २०००-२००१ च्या कृषी गणनेनुसार जिल्ह्यात एकूण २,९०,४६५ जमीनधारक आहेत. त्यांनी धारण केलेले एकूण क्षेत्र ५१८०८५ हेक्टर आहे. २ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्र धारण केलेले ९९५९० जमीनधारक असून, त्यांनी १४४१३७ क्षेत्र धारण केलेले आहे. २ ते ५ हेक्टर जमीनधारण केलेले क्षेत्र ८०१७३ धारकांनी धारण केलेले क्षेत्र २३५८९० आहे. ५ ते १० हेक्टर जमीन धारण केलेल्या क्षेत्र १०६६६ धारकांनी ६७१६१ क्षेत्र धारण केले आहे. १० ते २० व २० हेक्टर पेक्षा अधिक धारण केलेल अनुक्रमे ७६६ आणि ४२ जमीनधारक आहेत व त्यांनी ९१२६आणि १८७० क्षेत्र धारण केले आहे.

**३.१२.१ पीकाखालील क्षेत्र :**

जिल्ह्यात खरीप व रब्बी या दोन्हीं हंगामात पिके घेतली जातात. त्यामध्ये ज्वारी व कापूस ही प्रमुख पीक आहे. ज्वारी हे पीक दोन्ही हंगामात घेतले जाते. कडधान्याच्या वाढत्या मागणीमुळे त्याखालील क्षेत्र दिवसेंदिवसे वाढत आहे. जलसिंचनाची व्यवस्था असलेल्या क्षेत्रात उन्हाळी भुईमूगाचे उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो. खरीप हंगामात जिल्ह्यात ज्वारी, मुग तर रब्बी हंगामात ज्वारी व गहू ही मुख्य पिके घेण्यात येतात. सन २०११-१२ यावर्षात अंतिम अंदाजानुसार खरीप हंगामातील क्षेत्रात ज्वारी या पिकाचे क्षेत्र ५८,४०० हेक्टर होते. रब्बी हंगामातील ज्वारी व गहू ही पिके अनुक्रमे १,४७,००० हेक्टर आणि ३९,६०० हेक्टर क्षेत्रात घेण्यात आले. नगदी पिकामध्ये २०११-१२ यावर्षात खरीप हंगामात कापूस हे महत्वाचे आहे.

२३३६०० हेक्टर क्षेत्रात पिक घेण्यात आले. रब्बी हंगामात ३३४०० हेक्टर क्षेत्रात करडी हे पिक घेण्यात आले. त्याच प्रमाणे २०९०० हेक्टर क्षेत्रात ऊसाचे पिक घेण्यात आले. २०१०-२०११ यावर्षात परभणी जिल्ह्यात कडधान्याचे उत्पादन ५१९०० मे.टन झाले आहे. २०१०-११ या वर्षात परभणी जिल्ह्यात कापसाचे ३४१३००टन उत्पादन झाले आहे.

**३.१२.२ फळे व भाजीपाला :**

२०११-१२ मध्ये एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी फळे व भाजीपाल्याचे एकूण क्षेत्र ९०२५ हेक्टर आहे. जिल्हा औद्योगिकदृष्ट्या मागासलेला असल्यामुळे व जवळपास कोणतीही बाजारपेठ उपलब्ध नसल्याने जलसिंचनाची सोय उपलब्ध असूनही फळे व भाजीपाला उत्पादनात अपेक्षित वाढ झालेली दिसून येत नाही.

**३.१३ रासायनिक खतांचे वितरण :**

परभणी जिल्ह्यात २०११-१२ यावर्षात १,२४,५७२ मे.टन रासायनिक खतांचे वितरण करण्यात आले. परभणी जिल्ह्यात एकूण ९ कृषि उत्पन्न बाजार

समितीच्या मुख्यालयाच्या ठिकाणी शेतकऱ्यांना राहण्यासाठी विश्रामगृह बांधण्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शेतकऱ्यांना बैलगाड्या सोडण्यासाठी मोकळी जागा, बैलांना पाणी पिण्याची व्यवस्था इ. आवश्यक सेवा उलब्ध करुन दिल्या आहेत.

परभणी जिल्ह्यात २०११-१२ या वर्षात सर्व कृषि उत्पन्न बाजारपेठेतील ज्वारी व तूर या पिकाची आवक अनुक्रमे ३,०७९ टन व १२,३५४ टन झाली आहे.

जिल्ह्यातील एकूण शासकीय १७ गोदामे कार्यरत आहेत. त्यांची साठवण क्षमता ७९०० मे.टन एवढी आहे. याशिवाय ग्रामीण गोदाम योजनांतर्गत १११ गोदामापैकी ८८ गोदांमाचे काम पूर्ण झाले असून त्यांची साठवण क्षमता ११,७००मे.टन एवढी आहे. तसेच राष्ट्रीय सहकार विकास नियंत्रण योजनेंतर्गत ६४ गोदामे असून त्यापैकी ३ गोदामांचे बांधकाम चालू आहे. याशिवाय वर्षात कृषि उत्पन्न बाजार समितीकडे १० गोदामे असून त्यांची साठवण क्षमता २००० मे.टन जिल्हा मार्केट कमिटी फेडरेशनची स्वतःची व भाड्याने घेतलेली अशी एकूण २२ गोदामे असून त्यांची साठवण क्षमता २१२५० मे. एवढी आहे. सहकारी सूतगिरणी वखार महामंडळाकडे स्वतःच्या मालकीची भाड्याने घेतलेली व बांधकाम चालू असलेली अशी एकूण ५९ गोदामे आहेत. त्यांची साठवण क्षमता ७२००८ मे.टन एवढी आहे.

**३.१४ जलसिंचन :**

परभणी जिल्ह्यात २०११-१२ यावर्षात पृष्ठभागिय ओलिताखालील क्षेत्र १,६३,४८९ हेक्टर, विहीरीच्या ओलिताखालील क्षेत्र ४४,१३३ हेक्टर एवढे आहे.

**३.१५ पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय सेवा :**

परभणी जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या जनावरांची संख्या २००७ मध्ये घेण्यात आलेल्या पशुगणनेनुसार ८,१०,७०१ आहे. जिल्ह्यातील कुक्कूटपालन या व्यवसायात १,८६,५९४ कुक्कूटपालन पक्षी आहेत. या व्यवसायात अपेक्षित वृद्धी झालेली दिसून येत नाही.

**३.१६ पशुधनापासून उत्पादन :**

परभणी जिल्ह्यात २०११-१२ यावर्षात १२ अधिकृत कत्तलखाने असून त्यात प्रामुख्याने बैल, म्हशी व रेडे, मेंढ्या, शेळ्या यांची कत्तल केली जाते. शासकीय दूध योजनांतर्गत ११७५ हजार लीटर दूध संकलीत करण्यात आले.

**३.१७ पशुवैद्यकीय सेवा :**

परभणी जिल्ह्यात २०११-१२ यावर्षात ३० दवाखाने,५१ पशुउपचार केंद्र, ८३ कृत्रिम गर्भधाारण केद्र आहेत. जिल्ह्यात ४ दुधशितकरण केंद्र आहेत. ज्यामध्ये ३२ हजार लिटर दुधाचे प्रतिदिनी शितकरण केले जाऊ शकते. जिल्ह्यात गोळा करण्यात येणाऱ्यास दुधाच्या अल्प प्रमाणात परभणी, जिंतूर व गंगाखेड तालुक्यामध्ये वितरण केले जाते. जिल्ह्यात दुधाची मागणी कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात दुध जिल्ह्याबाहेर दुधाची भुकटी व इतर पदार्थ तयार करण्यासाठी पाठविले जातात.

**३.१८ मत्स्य व्यवसाय :**

परभणी जिल्ह्यात २०११-१२ मध्ये गोड्या पाण्यातील विविध जातीच्या १०२० लक्ष किंमतीच्या १७०० मे.टन माशाचे उत्पादन झाले. एकूण उत्पादनात राहू. मृगळ व कटला या तीन जातीच्या माशांचा मोठा वाटा आहे. जिल्ह्यात ८४९८ हेक्टर क्षेत्र मत्स्य व्यवसायासाठी अनुकूल आहे. ८३९३ हेक्टर क्षेत्र प्रत्यक्षात मत्स्य व्यवसायासाठी उपयोगात आणले आहे. त्यापैकी पूर्णा या मोठ्या प्रकल्पाअंतर्गत येलदरी येथील जलाशय तसेच करपरा व मासोळी या मध्यम प्रकल्पाची जलाशये एकूण जलक्षेत्र मत्स्य व्यवसायासाठी अनुकूल असलेल्या जलाशयाच्या १०० टक्के आहे. जलाशयामध्ये जिल्ह्यातील एकूण १४२७ सभासद असलेल्या २८ सहकारी संस्था असून त्याद्वारे संघटीतरित्या मत्स्य व्यवसाय केला जातो.

**३.१९ विद्युतीकरण :**

परभणी जिल्ह्यातील सर्व शहारांचे व गावांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. तसेच २०११-१२ या वर्षात जिल्ह्यात ४०,१५७ हजार किलोवॅट तास विजेचा वापर

करण्यात आला. या वापरापैकी घरगुतीसाठी ११,९४४ हजार किलोवॅट, व्यापारी व लघुशक्तीसाठी २१०५ हजार कि.वॅ. उद्योगासाठी १८०० हजार कि.वॅ., कृषिसाठी २१,१६७ हजार कि.वॅ., तर उर्वरित इतर कामासाठी ७२९ हजार कि.वॅ. विजेचा वापर करण्यात आला.

**३.२० खनीज :**

जिल्ह्यात कोणताही प्रमुख खनिजाचा साठा नाही. तथापी बांधकामासाठी आवश्यक असलेली रेती व दगडाचे साठे उपलब्ध असून त्यांचे आवश्यकतेनुसार उत्खनन केले जाते. याशिवाय विटा तयार करण्याकरीता आवश्यक असलेल्या मातीचा साठा जिल्ह्यात मुबलक आहे.

**३.२१ उद्योग :**

भारतीय अधिनियम १९४८/२००६ मध्ये जिल्ह्यात २०१० मध्ये नोंदणी झालेल्या १६६ कारखाण्यापैकी ९२ कारखाणे बंद आहेत. ७४ चालू कारखाण्यामध्ये २१५२ कामगार काम करीत आहेत.

**३.२१.१ उद्योग गटानुसार वर्गीकरण :**

प्रत्येक उद्योग गटात किती कामगार काम करतात. यांची गटवार माहिती मध्ये देण्यात आली आहे. एकूण २१,८६५ उद्योगात एकूण ४२,१५५ कामगार काम करतात. त्यापैकी सर्वाधिक उद्योग किरकोळ व्यापार ७,८३२ (३५ टक्के) सामूहिक, सामाजिक व व्यक्तीगत सेवा यात २,१९९ (१०टक्के) वस्तू निर्माण क्षेत्रात ४,७१० (२२ टक्के) तर उर्वरित २,२२४ (१०टक्के) उद्योग कृषी खनिज उत्पादन वीज व गॅस पाणी बांधकाम घाउक व्यापार साठवण वगैरे क्षेत्रात कार्यरत आहेत.

**३.२२ रस्ते व दळणवळण :**

मार्च २०१२ अखेर जिल्ह्यात नगरपरिषदा, जिल्हापरिषदा व राज्य क्षेत्राअंतर्गत एकूण ६३०७ कि.मी.लांबीचे रस्ते आहेत. त्यापैकी सिमेंट कॉकीट २७६ कि.मी., डांबरी १८८५ कि.मी. खडीचे पक्के रस्ते ३४५१ कि.मी.लांबीचे आहेत. त्यापैकी

८९७ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे परिरक्षण सार्वजनिक बांधकाम विभागामतार्फत, ४५३२ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे परिक्षण जिल्हा परिषदा मार्फत तर राहिलेल्या ८७९ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे परिक्षण नगरपरिषदामार्फत केले जात आहे. जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग ७६.४९ कि.मी. आहे. जिल्ह्यात प्रमुख जिल्हा रस्ते व इतर जिल्हा रस्ते यांची लांबी १९०० कि.मी. आहे. तर खेड्यातील रस्त्याची लांबी ३६७९ कि.मी. आहे.

**३.२३ नोंदणी झालेली मोटार वाहने :**

मार्च २०१२ अखेर जिल्ह्यात नोंदणी झालेल्या सर्व प्रकारच्या वाहनाची संख्या १,५२,९१९ आहे. मार्च २०१२ अखेर जिल्ह्यात १८,८३९ मालवाहतूक करणारी वाहने आहेत.

**३.२४ प्रवासी वाहतूक :**

परभणी हे शहर जिल्हा मुख्यालय आसून परभणी मुंबई व काचीगुडा, परळी बैंग्लोर या ब्रॉडगेज मार्गावरील रेल्वे जंक्शन आहे. १९९४-९५ या वर्षात परभणी मनमाड मुखेड हा ब्रॉडगेज मार्ग सुरु करण्यात आला. त्यामुळे जिल्ह्याचा थेट संपर्क मुंबई सारख्या मोठ्या शहराशी सुलभ होऊन जिल्ह्यातील नाशवंत वस्तुंना त्वरीत मोठी बाजार पेठ उपलब्ध झाली आहे. व पर्यायाने जिल्ह्यात उद्योग धंद्यात वाढ होऊन जिल्ह्याचे उद्योग धंद्यात वाढ होऊन जिल्ह्याचे मागासलेपण कमी होईल असे अपेक्षीत आहे. जिल्ह्यात सन २०११-१२ या वर्षा अखेर एकूण १७,४१२ कि.मी. लांबीच्या १८२ मार्गावर २१६ मार्ग परिवहन मंडळाच्या बस गाड्याद्वारे प्रवासी वाहतूक केली गेली. या वाहतूकीपासून महामंडळाला ६३५६.६०लाख रुपयाचे उत्पन्न झाले आहे. प्रत्येक दिवसी सरासरी ०.८९ लाख प्रवाशांची वाहतूक करण्यात आली असून प्रत्येक प्रवाशामागे १९.५१ रुपये सरासरी उत्पन्न महामंडळाला प्राप्त झाले.

**३.२५ डाकघरे व दूरध्वनी :**

मार्च २०१२ अखेर परभणी जिल्ह्यात १९४ डाकघरे आहेत. जिल्ह्यात २००१ च्या लोकसंख्येवर प्रती लाख लोकसंख्येचे मागे १२ डाक घरे येतात. तसेच मार्च २०१२ अखेर परभणी जिल्ह्यात एकूण २१,७१० दूरध्वनी कार्यरत आहेत.

**३.२६ दूरदर्शन आणि आकाशवाणी :**

परभणी येथे दिनांक १५ सप्टेंबर १९९४ पासून दूरदर्शन प्रक्षेपनल केंद्र कार्यान्वयीत झाले आहे. त्यामुळे लगतच्या २० कि.मी. अंतराच्या परिसरातील लोंकाना दूरदर्शनाचा लाभ मिळतो. तसेच परभणी येथे आकाशवाणी केंद्रही उपलब्ध आहे.

**३.२७ रोजगार आणि विनिमय :**

परभणी जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एक रोजगार विनिमय केंद्र आहे. नोकरी मागणाऱ्या उमेदवारांची नोंदणी नोंदविण्याकरिता या कार्यालयाचे फिरते पथक ठरावीक कालावधीच्या अंतराने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी उमेदवारांची नांव नोंदणी करत असते. मार्च २०१२ रोजगार मिळविण्याकरिता २३,५२० उमेदवारांची नांवे पटावर होती. वर्ष २०११-१२ मध्ये पटावर असलेल्या उमेदवारापैकी केवळ २०० सार्वजनिक तर ९२ खाजगी क्षेत्रात अशा एकूण २९२ उमेदवारांना नोकरी मिळाली.

**३.२८ आर्थिक गणना :**

जिल्ह्यात २००५ च्या आर्थिक गणनेनुसार २१,८६५ कृषी व बिगरी उद्योग आहेत. त्यापैकी १२,१०० (७४टक्के) स्वकार्यरत उद्योग तर ९७,७३५ (२६टक्के) आस्थापना आहेत. एकूण २१,८६५ उद्योगापैकी १६,३६० (७५टक्के) ग्रामीण तर ५५०५ (२५टक्के) नागरी भागात कार्यरत आहेत. एकूण उद्योगाच्या ८.३५ टक्के अनुसूचित जाती तर ३.७५ टक्के मालक अनुसूचित जमातीचे आहेत. जागेविरहीत कार्यान्वीत असलेल्या उद्योगाची टक्केवारी १४.७२टक्के आहे. तर केवळ १३.६३ टक्के उद्योगात उत्पादनासाठी वीजेचा वापर करण्यात येत आहे.

कृषि व बिगर कृषि उद्योगात ४२,१५५ कामगार काम करीत आहेत. त्यापैकी ग्रामीण भागात २,६५,५८५ (६३टक्के) तर १६४७ (३७ टक्के) नागरी भागात काम करीत आहेत. एकूण ४२,१५५ कामगारांपैकी १,६४७ कृषी तर ४०,५०८ बिगर कृषी उद्योगात काम करीत आहेत. एकूण कर्मचाऱ्यापैकी २३,६६१ (५६टक्के) कामगार हे वेतनावर काम करणारे आहेत. ग्रामीण व नागरी भागाकरिता वेतनावरील कामगाराची एकूण कामगाराशी टक्केवारी अनुक्रमे ४६ व ७३ येते.

**३.२९ सहकारी क्षेत्रातील आस्थापना :**

२००५ च्या आर्थिक जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण सहकारी औद्योगिक आस्थापना ह्या २१२ होत्या. त्यापैकी ग्रामीण भागात १६६ तर नागरी भागात ४६ आहेत. रोजगारानुसार सर्व आस्थापनामध्ये ४२,१५५ कामगार काम करीत आहे. त्यापैकी भागात २६,५५८ तर नागरी भागात १५,५९७ आहे. एकूण उद्योगापैकी सहकारी क्षेत्रात कार्यरत असलेल्या उद्योगांची टक्केवारी ही केवळ १ टक्का एवढी आहे.

**३.३० बँका :**

मार्च २०१२ अखेर जिल्ह्यात वर्गीकृत बँकाच्या २०३ शाखा असून त्यांच्या एकूण ठेवी. रु. २,२३,२६१ लाख आहे.

**३.३१ सहकार :**

मार्च २०१२ अखेर जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या २,९१३ सहकारी संख्या कार्यरत आहे. सन २०१२ अखेर या संस्थांच्या ४९३ हजार सभासदांनी ४,५७,०८५ हजार रुपये भाग भांडवल भरण केला आहे. परभणी जिल्ह्यात एकूण सर्व प्रकारच्या २,९१३ संस्थापैकी २८५ दुग्ध व्यवसाय करणाऱ्या संस्था आहेत. तर १६० कामगार कंत्राटदार संस्था आहेत.

**३.३२ किरकोळ किंमती :**

प्रमुख खाद्यवस्तूंच्या २०१२ या वर्षात प्रति किलो सरासरी किमती तांदुळ (मध्यप्रत) ३९.५०रु. गहू (पांढरी) १४.००हरभरादाळ ४२.००रु. तुरदाळ ५६.००रु. साखर (खुला बाजार) ३०.५०रु. भूईमुग तेल १०४.००रु. वनस्पती तूप (डालदा) ७०.००रु. आहे. तर अखाद्य वस्तूंच्या किंमती अंगाचा साबण (लक्स) १८.००रु. या प्रमाणे आहे.

**३.३३ शैक्षणिक संस्था :**

सन २०१२-१२ अखेर जिल्ह्यात १,३३३ प्राथमिक शाळा, ७५९ माध्यमिक शाळा तर ३२१ उच्च माध्यमिक व २८६ महाविद्यालये आहेत. सन २०११-१२ या वर्षात प्राथमिक शाळेत ३३० हजार, माध्यमिक शाळेत १३१ हजार तर उच्च शिक्षण ३९ हजार विद्यार्थी आहे. सन २०११-१२ या वर्षात प्राथमिक शाळेतील शिक्षकाची संख्या ७९१७ माध्यमिक शिक्षकाची संख्या २८३१ एवढी आहे.

**३.३४ आरोग्य सेवा :**

जिल्ह्यात २०११-१२ या वर्षात शासन व शासन सहाय्यीत संस्थांची एकूण १० रुग्नालये, प्राथमिक आरोग्य केंद्र ३१, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र २१४ आहेत. वरील सर्व आरोग्य संस्थेत ६७६ खाटा असून त्यापैकी २८० स्त्रीयासाठी तर १९० मुलासाठी असून १४३ डॉक्टर व वैद्य ४३७ परीचारीका आहेत. २०११-१२ या वर्षात १,४०,११९ आंतररुग तर ८१,३११४ बाह्यरुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. २०११-१२ या वर्षात १९,५८० जन्म नोंदविल्या गेले असून मृत्युची संख्या ४,३४१ आहे.

**३.३४.१ कुटुंब कल्याण कार्यक्रम :**

जिल्ह्यात एकूण ३१ कुटुंब कल्याण केंद्र आहेत. २०११-१२ या वर्षात ५,३४२ व्यक्तिवर निबीर्जीकरणाच्या शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यापैकी ५,३०३ स्त्रीया आहेत व पुरुष ३९ आहेत.

**३.३५ नळाद्वारे पाणीपुरवठा :**

२०११-१२ या वर्षात जिल्ह्यातील एकूण वस्ती असलेल्या गावापैकी ५१० गावांना बारा महिने पाणी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच ५१० गावापैकी राहीलेल्या ६ गावाना टॅकरणे पाण्याचा पुरवठा करण्यात आला.

**३.३६ संकीर्ण :**

जिल्ह्यात एकूण ८ नगरपरिषदा आहे. त्यापैकी एक म.न.पा आहे. २०११-१२ यावर्षात त्यांचे उत्पन्न १३७५१ लाख रुपये आहे. जिल्ह्यातील २०११-१२ यावर्षात सर्व नगर पालिकेचा एकूण खर्च रु २७६१ लाख रु. आहे. त्यापैकी सामान्य प्रशासनावर रु. ८७५ लाख, सार्वजनिक आरोग्य व सोई रु. ४७७ खर्च करण्यात आला आहे. २०१०-११ यावर्षात जिल्हा परिषदेचे एकूण उत्पन्न ३६५२२ लक्ष रु. असून एकूण खर्च २९३५८ लक्ष रु. आहे. २०१०-११ वर्षात जिल्ह्यात ७०४ ग्रामपंचायती आहेत. एकूण त्याचे उत्पन्न ५०२६ लाख रु. तर खर्च ४१५० लाख रु. आहे.

**३.३७ पोलिस व गुन्हेगारी :**

२०११ या वर्षात जिल्ह्यात १७ पोलिस ठाणे, १० आउट पोस्ट, २७ सबपोस्ट व १६ लॉक अप्स कार्यरत आहेत. एकूण पोलीस दलाची संख्या ३५२२ आहे.

**३.३८ करमणुक :**

जिल्ह्यात २०१०-११ या वर्षात १६ कायम स्वरुपाची तर ४ फिरती चित्रपट गृहे आहेत. शिवाय २८ सरकारमान्य व्हिडिओ केंद्र आहेत. या शिवाय परभणी येथे अद्यावत पद्धतीचे नाट्यगृह बांधलेले आहे. सेलू येथे खुल्या नाट्यगृहाद्वारे वर्षातून बरेच मनोरंजनाचे कार्यक्रम होत असतात. परभणी येथे अद्यायत असा पोहण्याचा तलाव असून जनतेसाठी तो नोंदणी फि आकारुन पोहण्यासाठी खुला करण्यात आला आहे.

**३.३९ पर्यटन :**

परभणी जिल्ह्यात पालम तालुक्यातील गोदावरीच्या पात्रातील बेट म्हणजें जांबुळबेट हे एक निसर्गरम्य ठिकाण आहे. तसेच परभणी येथे 'सय्यद शहा तूराबुलहक्क' यांचा तुरतपीरचा दर्गा आहे. येथे दरवर्षी दोन फेब्रुवारी रोजी मोठा उरुस भरतो.

**संदर्भ :**

१)	महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, परभणी जिल्हा, कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८, पृ. १

२)	उपरनिर्दिष्ट, पृ. ६५

३)	जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन (२०१२) जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई